# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

दुरध्वनी क्र. :- ०२०-२५६०११८९/११९०
फॅक्स नं. - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ:- www.unipune.ac.in

**आरक्षण विभाग**
गणेशखिंड, पुणे-४११००७
ई-मेल:- arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्रमांक:- आरक्षण /ओ-२२/२२१

दिनांक : २५.०२.२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत
सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

**विषय** : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. १९ जुलै, २०१८ रोजीच्या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करणेबाबत.

**संदर्भ** : शासन पत्र क्र. न्यायाप्र-२०१८/प्र.क्र.२३/१८/विशि-१ दिनांक : १७ जानेवारी, २०१९.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासनाच्या पत्रास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासन निर्णय दि. २४ ऑगस्ट, २०१५ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिक्षक पदांसाठी दि. २४.४.१९९५ अन्वये घेण्यात आलेल्या संवर्ग व विषयनिहाय आरक्षण ठेवण्याबाबतच्या आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका क्र. १२०५१/२०१५ दाखल झालेली आहे. तसेच सैद्यःस्थितीत शासन निर्णय दि. २४ ऑगस्ट, २०१५ नुसार राज्यात सुरु असलेल्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी सुरु आहे. तथापि, त्यानुसार नियुक्त झालेल्या शिक्षक कर्मचारी यांच्या नियुक्ती आदेशामध्ये सदरची नियुक्ती याचिका क्र. १२०५१/२०१५ मधील मा. न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधिन राहून असेल, असे स्पष्ट नमूद करावे (सोबत पत्र). कृपया याची नोंद घ्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

२५।२।१९.

उपकुलसचिव,
(आरक्षण कक्ष)

**सोबत** : वरीलप्रमाणे.

D:\Circulars\Circulars.docx

महाराष्ट्र शासन

क्रमांक:-न्यायाप्र-२०१८/प्र.क्र.२३/१८/विशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ३२.
दिनांक:- १७ जानेवारी, २०१९

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय:- उच्च शिक्षण विभागाच्या शिक्षकीय (प्राध्यापक) संवर्गाच्या आरक्षणाचे प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.१९ जुलै, २०१८ रोजीच्या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्र. उशिसं/मवि-१/शिक्षकीय पदांचे आरक्षण/२०१८/१९८३७, दिनांक १२.१२.२०१८.

आपल्या विषयांकित बाबतचे संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती नमूद करून राज्यस्तरावरील मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी झालेले आदेश तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या व मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या पत्रान्वये आरक्षण धोरणाबाबत निर्गमित केलेल्या सूचना राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना लागू करण्यात याव्यात किंवा कसे याबाबत अभिप्राय देण्यास सामान्य प्रशासन विभाग व विधी व न्याय विभागास विनंती करण्यात आली. त्यानुषंगाने प्रकरणी विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार पुढीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

१) शासन निर्णय दि.२४ ऑगस्ट, २०१५ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक पदांसाठी शासन निर्णय दि.२४.०४.१९९५ अन्वये घेण्यात आलेला संवर्ग व विषय निहाय आरक्षण ठेवण्याबाबतचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे. सदरहू आदेशविरुध्द मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका क्र.१२०५१/२०१५ दाखल झालेली आहे. मा. न्यायालयाने सदरहू याचिकेत दि.२८.०४.२०१६ रोजी अंतरित आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार सद्य:स्थितीत शासन निर्णय दि.२४ ऑगस्ट, २०१५ नुसार राज्यात सुरू असलेल्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी सुरू आहे. तथापि, त्यानुसार नियुक्त झालेल्या

कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये सदरची नियुक्ती याचिका क्र.१२०५१/२०१५ मधील मा. न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून असेल असे स्पष्ट नमूद करावे.

२) तसेच उक्त नमूद याचिका क्र.१२०५१/२०१५ मधील दि.२८.०४.२०१६ रोजी पारित केलेले अंतरिम आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निदर्शनास आणून सदर आदेशानुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने आरक्षणासंदर्भात निर्गमित केलेल्या सूचनांचे पुनर्विलोकन करण्याची विनंती विद्यापीठ अनुदान आयोगास आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

३) सदरचे पत्र विधी व न्याय विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५७/बी. दि.१६.०१.२०१९ अन्वये दिलेल्या अभिप्रायानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(विजय साबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- कार्यवाहीस्तव,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण,
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,
संग्रहार्थ.